

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५० ▪ गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

मुर्तडकर-जाधव समर्थकांमध्ये मंगलगेट परिसरात मध्यरात्री राडा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील मंगलगेट परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास दोन राजकीय गटांमध्ये झालेल्या तुंबळ हाणामारीने खळबळ उडाली आहे. नगरसेवक सागर मुर्तडकर यांचे बंधू सनी मुर्तडकर आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन जाधव यांच्यात झालेल्या वादाचे रूपांतर दोन्ही बाजूंच्या समर्थकांमधील संघर्षात झाले. या राड्यात दोन्ही गटांचे कार्यकर्ते जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास मंगलगेट भागातील कोंड्यामामा चौकातील मच्छी मार्केट



परिसरात एका खासगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान सनी मुर्तडकर आणि सचिन जाधव यांच्यात शाब्दिक वाद झाला. सुरुवातीला किरकोळ वाटणारी ही बाचाबाची काही वेळातच चांगलीच चिघळली. पाहता पाहता दोन्ही बाजूंचे समर्थक समोरासमोर आले आणि त्यांच्यात तुंबळ हाणामारी सुरू झाली. मध्यरात्री अचानक झालेल्या या राड्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला.

घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, या घटनेमुळे मंगलगेट परिसरात तणावाचे

वातावरण निर्माण झाले आहे. नेमका वाद कोणत्या कारणावरून सुरू झाला, हाणामारीला सुरुवात कोणी केली आणि या प्रकरणात कोणकोण सहभागी होते, याचा तपास तोफखाना पोलीस करीत आहेत. दोन्ही गटांचे जखमी कार्यकर्ते रुग्णालयात दाखल झाल्याने या वादाची तीव्रता अधिक वाढल्याचे दिसून येत आहे.





जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच डॉ. सुजय विखे पाटील यांचा निर्धार

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. सुजय विखे पाटील यांनी आज अधिकृतपणे स्वीकारली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी बँकेच्या आगामी कामकाजाची दिशा स्पष्ट करताना शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतले जातील, अशी भूमिका मांडली. बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम सुविधा आणि योजनांचा लाभ मिळवून देण्यावर आपला भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, पदभार स्वीकारल्यानंतर तातडीने लोकप्रिय निर्णय घेण्यापेक्षा सर्वप्रथम बँकेची आर्थिक परिस्थिती, सध्याचे कामकाज आणि उपलब्ध योजनांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. बँकेची आर्थिक स्थिती समजून घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताचे आणि बँकेच्या प्रगतीला पूरक ठरणारे निर्णय घेतले जातील.

शेतकऱ्यांसाठी बँकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी पुणे आणि मुंबई जिल्हा सहकारी बँकांच्या कामकाजाचा तसेच त्यांनी राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सहकार क्षेत्रातील चांगल्या उपक्रमांचा अवलंब करून अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या कामकाजात आवश्यक सुधारणा करण्यावर भर राहणार आहे.

बँकेच्या नावातील बदलाबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेऐवजी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक असे नामकरण करण्याचा प्रस्ताव असून, यासाठी रिझर्व्ह बँकेशी संबंधित तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऊसदराच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी शेतकरी संघटनेच्या मागण्या आणि भूमिका समजून घेतल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला योग्य दर मिळावा, त्याचवेळी सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक गणितही बिघडू नये, यासाठी समन्वयातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. आगामी काळातील दुष्काळी परिस्थिती आणि कारखान्यांसमोरील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन सर्व घटकांच्या हिताचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे बँकेचा कारभार अधिक सक्षम, पारदर्शक आणि शेतकरीकेंद्रित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी भूमिका डॉ. सुजय विखे पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली.

बंद घर चोरट्यांच्या निशाण्यावर; सव्वा लाखांची रोकड लंपास

केडगावच्या मराठानगरमधील तानाजी मालुसरे अपार्टमेंटमध्ये घरफोडी; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरासह उपनगरांमध्ये चोरी आणि घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, बंद घरे चोरट्यांच्या निशाण्यावर आली आहेत. घराला कुलूप असल्याची संधी साधून चोरटे हात साफ करत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

केडगाव उपनगरातील मराठानगर परिसरात अशीच घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. तानाजी मालुसरे अपार्टमेंटमधील बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरातील तब्बल एक लाख २५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. या घटनेमुळे केडगाव परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आदर्श ज्ञानदेव तनपुरे (वय २५, रा. तानाजी मालुसरे अपार्टमेंट, मराठानगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. तनपुरे कुटुंबीय एकत्र राहत असून, आदर्श आणि त्यांचा भाऊ प्रशांत हे पुणे येथील एका कंपनीत अभियंता म्हणून नोकरी करतात. कामानिमित्त दोघेही पुण्यात वास्तव्यास असतात, तर त्यांचे वडील ज्ञानदेव लक्ष्मण तनपुरे हे ठायी ■ पान ४ वर

चर्चगेट स्थानकाजवळील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे, सौंदर्यस्थळाचे सुशोभीकरण पूर्णत्वाकडे

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्याकडून पाहणी, उद्घाटन लवकरच

मुंबई । वृत्तसंस्था– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चर्चगेट स्टेशन जवळ असलेल्या पुतळ्याचे आणि परिसराचे सुशोभीकरण पूर्ण होत आले असून आज दिनांक १९ नोव्हेंबर, २०२६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांनी या ठिकाणी भेट दिली आणि सौंदर्य कलात्मकता वाढीच्या दृष्टीने महत्वपूर्ण सूचना दिल्या. याप्रसंगी मुंबई महापालिकेचे सहायक आयुक्त श्री. उज्ज्वल इंगोले, कार्यकारी अभियंता श्री.विराज जाधव आणि सहायक अभियंता, परिरक्षण ए विभाग श्री.रवी म्हस्के, दुय्यम अभियंता श्री. गणेश ठाकूर हे उपस्थित होते.



पुतळा परिसराचे दुरुस्तीकार्य, सुशोभिकरण तातडीने पूर्ण व्हावे तसेच पाठीमागील भिंतीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्य, महेश्वर येथील राजवाडा प्रवेशद्वाराची प्रतिकृती, इंदोर येथील वास्तूशिल्प, भित्तीशिल्पाद्वारे ऐतिहासिक संदर्भ आकर्षक स्वरुपातील प्रकाश योजनेसह मांडण्यात यावे, अशी संकल्पना महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांनी ■ पान ४ वर

जावयाच्या नावाने लोन मंजूर झाल्याचे खोटे सांगून महिलेची फसवणूक; सोन्याच्या बांगड्या घेऊन पसार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जावयाचे २ लाख १५ हजार रुपयांचे लोन मंजूर झाल्याचे खोटे सांगून विश्वास संपादन करत एका अनोळखी भामट्याने ७६ वर्षीय वृद्धेच्या हातातील १ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या चार सोन्याच्या बांगड्या लंपास करत त्यांची फसवणूक केल्याची घटना शहरातील चाणक्य चौकात १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सौ. विमला अशोकलाल भंडारी (वय ७६, रा. परदेशी गल्ली, जैन मंदिराच्या पाठीमागे, अहिल्यानगर, मूळ रा. बाणेर, पुणे) यांनी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे १७ नोव्हेंबर रोजी आनंदऋषी हॉस्पीटल, नेत्रालय येथे डोळ्याचे ऑपरेशन झाले होते. दुसऱ्या दिवशी १८ नौव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास त्या पती अशोकलाल मोहनलाल भंडारी यांच्यासह डोळे तपासणीसाठी हॉस्पीटलमध्ये गेल्या होत्या.

तपासणीनंतर भाची वैशाली चेगेंडिया हिने त्यांना घरी जाण्यासाठी रिक्षा ठरवून दिली आणि ती निघून गेली. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पती-पत्नी चाणक्य चौकातून रिक्षाने घरी जात असताना लाल रंगाच्या मोटारसायकलवरून एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला. त्याने पती अशोकलाल भंडारी यांना जावई महेश सचदेव कसा आहे, अशी विचारणा केली. अनोळखी इसम जावयाला ओळखत असावा या समजुतीने पतीने महेश मस्त असल्याचे सांगितले. त्यावर भामट्याने जावई महेशचे २ लाख १५ हजार रुपयांचे लोन मंजूर झाले असून त्याचे पैसे तुमच्याजवळ देतो, असे सांगितले. हा प्रकार ऐकून पती अशोकलाल भंडारी हे जावई महेश याला फोन करण्यासाठी बाजूला गेले. त्याच संधीचा फायदा घेत अनोळखी इसम फिर्यादीजवळ महिलेजवळ आला आणि आईसारखे संबोधत रिक्षातून खाली उतरवून सोन्याच्या बांगड्यांचे ■ पान ४ वर

एकविरा चौक परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक परिसरातून एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अपहृत मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. फिर्यादी या धुणेभांड्याचे काम करतात, तर त्यांचे पती हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. त्यांना १ मुलगा आणि १४ वर्षांची १ मुलगी आहे. ती आईसोबत सावेडी भागात धुणेभांड्याचे काम करत होती. १२ नोव्हेंबर सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत ती घरातून गायब झाली. तिच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तिचा फोन बंद असल्याचे आढळून आले.

कुटुंबीयांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच संपूर्ण अहिल्यानगर शहरात तिचा कसून शोध घेतला, मात्र ती कोठेही मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी आपल्या मुलीला कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळवून नेल्याची खात्री ■ पान ४ वर

नंदी भक्ती, भैरवनाथ रक्षणाचे प्रतीक; शिव महापुराण कथेत भक्तांना आध्यात्मिक संदेश

दिल्ली गेट येथील शिव महापुराण कथा सप्ताहाचा सहावा दिवस भक्तिमय वातावरणात संपन्न





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिव महापुराण कथा सप्ताहाचा सहावा दिवस भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी भगवान महादेवाचे अवतार नंदी, भैरवनाथ आणि श्री जिव्हेश्वर यांच्या महत्त्वाचे निरूपण करत भाविकांना भक्ती, श्रद्धा, निष्ठा, संयम आणि सेवाभावाचा संदेश दिला.

नंदी हे भगवान महादेवाचे परमभक्त असून भक्ती, निष्ठा, संयम, शक्ती आणि समर्पणाचे प्रतीक आहेत. नंदीने भगवान शंकराची कठोर तपस्या करून त्यांचे आशीर्वाद प्राप्त केले. त्यामुळे त्यांना शिवगणांचा प्रमुख मानले जाते. महादेवाच्या मंदिरात नंदीची मूर्ती नेहमी शिवलिंगासमोर विराजमान असते. भक्त नंदीच्या कानात आपली मनोकामना सांगतात, अशी श्रद्धा असून नंदीच्या माध्यमातून आपली प्रार्थना भगवान शंकरापर्यंत पोहोचते, अशी भाविकांची भावना आहे. नंदी आपल्याला श्रद्धा, निष्ठा, शांतता आणि सेवाभावाचा संदेश देतात, असे महाराजांनी सांगितले.

भैरवनाथ हे भगवान शिवाचे उग्र आणि शक्तिशाली स्वरूप मानले जाते. रक्षण करणारे आणि संकटांचा नाश करणारे देवता म्हणून भैरवनाथांची पूजा केली जाते. भैरवनाथांच्या पूजेमुळे भय, संकटे आणि नकारात्मक शक्तींपासून संरक्षण मिळते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. अनेक गावांमध्ये भैरवनाथ ग्रामदैवत म्हणून पूजले जातात. गावाचे रक्षण करणारे, न्याय देणारे आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारे दैवत म्हणून त्यांची विशेष ओळख आहे. नंदीची अढळ भक्ती आणि भैरवनाथांचे रक्षक स्वरूप यांचे स्मरण केल्याने भगवान महादेवाप्रती श्रद्धा अधिक दृढ होते, असे त्यांनी निरूपण केले.

श्री जिव्हेश्वर हे भगवान शंकराचे अवतार असून त्यांच्या आशीर्वादाने कुटुंबात सुख, शांती, समृद्धी आणि आनंद नांदतो. त्यांच्या स्मरणातून सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक समाधान प्राप्त होते, असे ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपतीचे स्मरण करून त्यांच्या महत्त्वाचेही वर्णन केले.

कथा निरूपणादरम्यान महाराजांनी आई-वडिलांच्या सेवेचे महत्त्व अधोरेखित केले. आई-वडिलांच्या सेवेतून जेवढे पुण्य मिळते, तेवढे अन्य कोणत्याही सेवेतून मिळत नाही. शेतकऱ्यांसारखे श्रीमंतीचे काळीज कोणाचेही नसते; त्यामुळे आपल्या मनाला कधीही भिकारी ठेवू नका, असा मोलाचा उपदेश त्यांनी भाविकांना केला. ■ पान ४ वर

'लाल परीचे खाजगीकरण होऊ देणार नाही' - रमेश सानप

सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या विभागाध्यक्षपदी रमेश सानप । एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या अहिल्यानगर विभागाध्यक्षपदी रमेश सानप यांची निवड झाल्याबद्दल एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार नवनिर्वाचित विभागाध्यक्ष रमेश सानप यांनी व्यक्त केला. तसेच एसटी महामंडळाचे खाजगीकरण होऊ देणार नाही, लाल परीचे हित जपण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

एसटी महामंडळातील कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यांच्या व्यथा मोठ्या आहेत. आमदार गोपीनाथ पडळकर आणि सदाशिव खोत यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच या माध्यमातून एसटी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले जात आहे. एसटी कर्मचारी आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहे. एसटी ■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे बसद्वारे आयोजन; २९ डिसेंबरपासून धार्मिक यात्रेला प्रारंभ

अहिल्यानगर- हिंदू धर्मात विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे आयोजन २९ डिसेंबर २०२६ ते १२ जानेवारी २०२७ या कालावधीत करण्यात आले आहे. ही संपूर्ण परिक्रमा बसद्वारे होणार असून, भाविकांना आरामदायी आणि सुविधायुक्त प्रवासाचा अनुभव मिळावा, या दृष्टीने नियोजन करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. नर्मदा परिक्रमेचे आद्य प्रवर्तक म्हणून श्री मार्कंडेय मुनी यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी सुमारे सात हजार वर्षांपूर्वी नर्मदा परिक्रमा केल्याची धार्मिक मान्यता आहे. नर्मदा नदीच्या दोन्ही तीरांवरून तिच्या प्रवाहाला मिळणाऱ्या ९९९ नद्यांच्या उगमस्थानांना वळसा घालत त्यांनी ही परिक्रमा पूर्ण केली, असे सांगितले जाते. त्यामुळे नर्मदा परिक्रमेचे हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नर्मदा नदीच्या काठाने केली जाणारी प्रदक्षिणा म्हणजेच नर्मदा परिक्रमा होय. ही केवळ धार्मिक यात्रा नसून मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक साधनेचा एक महत्त्वपूर्ण अनुभव मानला जातो. परिक्रमेच्या मार्गावर असलेली प्राचीन मंदिरे, सुंदर घाट, निसर्गरम्य परिसर, नर्मदा मातेचा अखंड वाहणारा प्रवाह आणि स्थानिक नागरिकांची श्रद्धा यामुळे परिक्रमावासीयांना वेगळाच आध्यात्मिक आनंद अनुभवता येतो. नर्मदा मातेचे दर्शन आणि तिच्या सान्निध्यात काही दिवस घालविण्याची संधी या यात्रेच्या माध्यमातून भाविकांना मिळणार आहे. या यात्रेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे परिक्रमेदरम्यान प्रत्येक ठिकाणी हॉटेलमधील डबल शेअरिंग एसी रूममध्ये मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. सामूहिक निवास व्यवस्थेमुळे होणारा त्रास टाळून यात्रेकरूंना पुरेशी विश्रांती आणि आवश्यक सुविधा मिळाव्यात, याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. तसेच संपूर्ण प्रवास एसी पुशबॅक व एअर सस्पेन्शन बसमधून होणार आहे. यात्रेदरम्यान दररोज नर्मदा मैय्याची आरती, संकल्प, नर्मदा मातेला साडी अर्पण करण्यासह विविध धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासासोबतच भाविकांना नर्मदा मातेच्या भक्तीचा आणि आध्यात्मिक साधनेचा अनुभव घेता येणार आहे. या धार्मिक यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी अधिक माहितीसाठी अभिजीत पोळ (मो. ९४२२२२७९०६) आणि नंदकुमार पोळ (मो. ७८७५५०००५६) यांच्याशी संपर्क साधावा.

दीर्घकालीन विचारातून पाण्याचे नियोजन करा; भूजल पातळी वाढविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना राबवा

अहिल्यानगर - यंदा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे राज्यातील अनेक भागांत भीषण दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑक्टोबर महिन्यातच अनेक नद्या, ओढे, तलाव आणि धरणांनी तळ गाठल्याने आगामी सहा ते सात महिन्यांत पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेता शासनाने तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन जलनियोजनावर भर द्यावा. भूजल पातळी वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी शासनाकडे केली आहे. यंदा कमी पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये भूजल पातळी खोल गेली असून, त्याचा परिणाम विहिरी, बोअरवेल, ओढे आणि नद्यांच्या पाणीपातळीवर झाला आहे. विशेषतः मराठवाड्यातील काही भागांत भूजल पातळी ४० ते ७० फुटांपर्यंत खाली गेल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी भविष्यात टँकरसाठी पाण्याचे स्रोतच आटल्यास पाणीपुरवठा कसा करणार, हा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. शहरी भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्ते आणि नाल्यांमधून वाहून जाते. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांमुळे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. त्यामुळे सार्वजनिक, शासकीय तसेच खासगी इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्याची मोहीम शासनाने हाती घ्यावी. १०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या इमारतींवर पर्जन्यजल संकलन प्रणाली बसविण्याच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी. विशेष म्हणजे अनेक शासकीय इमारतींमध्येही या यंत्रणेचा अभाव असल्याचे दिसून येते.



अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे ५ ई-कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत शहरात ई-कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी ३६५ दिवस सुरू राहणाऱ्या पाच ई-कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन महापौर सौ. ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सहाय्यक आयुक्त हरिकल्याण येलगट्टे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सेवा भारतीचे उदय भानगे, सामाजिक कार्यकर्ते पुष्पक कुलकर्णी, हरियाली संस्थेचे सुरेश खामकर, घनकचरा व्यवस्थापन विभागप्रमुख प्रशांत रामदीन तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

महानगरपालिकेतर्फे सुरू करण्यात आलेली ही पाच ई-कचरा संकलन केंद्रे प्रभाग समिती कार्यालय क्रमांक १, २, ३ व ४ तसेच महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात कार्यान्वित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर वर्षभर नागरिकांना घरातील ई-कचरा जमा करता येणार आहे.

मोबाईल, चार्जर, बॅटरी, संगणक, की-बोर्ड, माऊस, खराब इलेक्ट्रॉनिक उपकरणे व इतर ई-कचरा यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ई-कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट लावल्यास पर्यावरण व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या घरातील ई-कचरा इतर घनकचऱ्यात न मिसळता जवळच्या ई-कचरा संकलन केंद्रात जमा करावा. संकलित ई-कचऱ्यावर नियमानुसार शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येणार आहे.

प्राउड ऑफ यू बेटा- पूर्वजा



खरच मूल मोठी झाली आणि जबाबदारीनेकाम केले की आई वडिलांची कॉलर टाईटच, त्याच अस झाले सालाबादप्रमाणे याही वर्षी माझ्याकडे सर्व जवळच्या नातेवाईकांसाठी जेवणाचा बेत केला होता या मध्ये माझे भाऊ, त्याची बायको, मुले,चुलते, चुलती, त्यांच्या सुना, नातू, आत्याची मुले सुना नातू असा ४० लोकांचा बेत व्हेज नॉनव्हेज स्वयंपाक करण्याचा केला होता.

पहिल्यांदा मुलीने सर्व जबाबदारी घेण्याचे ठरवले मग भाजीपाला किराणा व नॉनव्हेज आणण्यापासून पुढाकार घेतला त्या नंतर सर्व मसाले बनवणे मग खरी सुरुवात स्वयंपाकाची तिने बॉम्ब फोडल्यासारख्या जाहीर केले की, स्वयंपाक चुली वर करायचा, आता चुलीवर कसे सर्वजण आवाकच झाले, पण तिने निश्चय पक्का केला, झाली सुरुवात चुलीने, चूल कुठून आणायची मग युक्ती केली आणि विटा आणून चूल बनवले, लाकडे लागणार पेटवायला, मग अडगळीतीला पडलेले लाकडे तुकडे बाहेर काढली आणि चूल पेटवायला सुरुवात केली, चूल पेटती कुठे, रॉकेल कुठून भेटणार मग मुलीने युक्ती केली सेनिटायझर टाकून कागदाची गोळे टाकून व नंतर फडक्याची तुकडे टाकून कशी बशी चूल पेटली, पण आता खरी मजा पुढे आली चुली वर जी भांडे लावायची त्याला मातीने सारवल्याशिवाय स्वयंपाक करता येणार नाही मग काय मुलगी हटली नाही नीट कुंडीमध्ये पाणी टाकून चिखल तयार करून भांड्याला लावून स्वयंपाक सुरू केला, हे सर्व ती मनलावून करत होती, आज इतके शिकलेल्या मुली हे कसे काम करणार शक्यच नाही, पण मुलीने कोणत्याच गोष्टीची लाज ना भीती मनात न ठेवता बिनधास्त पणे स्वयंपाक सुरू केला अधून मधून मोठा धूर होत होता, डोळे चोळत का होईना, पेपरने वारा देत चूल कायम पेटवून ठेवून स्वयंपाक यशस्वी रित्या पूर्ण करण्यास आधाडीची भूमिका घेतली, तसे पाहिले तर या कामात तिला माझे चुलत भाऊ त्यांच्या बायकांनीही मदत केलीच.

सध्याच्या काळात इतके हायटेक जग झाले असताना लाकडी चूल म्हणजे काय हे आजच्या लोकांना युवकाना कळणारही नाही अश्या परिस्थितीत तिने बी एस सी बायोटेक, एम ए अंथ्रोलोजी, कथक मध्ये विशारदच्या अंतिम परीक्षेला आणखी काय कोर्स करतेय हे सर्व शिकत असणारी मुलगी,तिने जे धैर्य दाखवून पूर्वजांनी दिलेले शिकवण पुढे आणून जे काम केले खरच ते कौतुकास्पद आहेच कारण आजच्या जमानात मुली चुली वर स्वयंपाक करणे दूरच पण गॅस वर सुद्धा करणे अवघड आहे, म्हणूनच म्हणावे वाटते

प्राउड ऑफ यू बेटा, पूर्वजा

संकलन
श्रीनिवास बोजा
मो.८२९३७४२५५५

माथणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज हँडवॉश स्टेशन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थी यांच्या लोकसहभागातून विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी सहा बेसिन बसून सुसज्ज असे हॅन्डवॉश स्टेशन तयार करण्यात आले आहे. नुकतेच या हॅन्डवॉश स्टेशनचे उद्घाटन ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. जेवणापूर्वी हात धुण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये लागावी . त्यांना स्वच्छतेचे महत्व समजावे .तसेच हात धुतलेल्या पाण्याचा पुनर्वापर करता यावा .यासाठी हे हँडवॉश स्टेशन अतिशय उत्कृष्टपणे तयार करण्यात आले आहे. हे हॅन्डवॉश स्टेशन लोकसभागातून मिळण्यासाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ , राहुल व्यवहारे यांनी ग्रामस्थांकडे वेळोवेळी मागणी केली होती. ग्रामस्थांना हॅन्डवॉश स्टेशनचे महत्त्व त्यांनी पटवून दिले होते. त्यामुळे ग्रामस्थांनी व माजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शाळेत सहा बेसिन देऊन सुसज्ज असे हॅन्डवॉश स्टेशन बांधकाम लोकसहभागातून करून दिले आहे. विद्यार्थ्यांना आरोग्याच्या चांगल्या सवयी रुजण्यास यामुळे मोठी मदत झाली आहे .विद्यार्थी वेळोवेळी हात स्वच्छ धुतात. हात स्वच्छ कसे धुवावेत याबाबतची कृतीशील ज्ञान त्यांना शिक्षकांनी दिले आहे. तसेच पाणी म्हणजे जीवन आहे .त्यामुळे पाण्याची बचत होण्यासाठी हात धुण्यासाठी वापरलेले पाणी झाडांना दिले जाते .त्यामुळे यातून पाण्याचा योग्य वापर करावा हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजले आहे. तसेच यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजला आहे.

'श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या आरतीचे विमोचन व नाथबाबांच्या पोस्टरचे अनावरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ऐतिहासिक अहिल्यानगर शहराचे उपमहापौर व नेवासा बुद्रुकचे भूमिपुत्र श्री धनंजय भैय्या कृष्णा भाऊ जाधव यांच्या पुढाकारातून अहिल्यानगर येथे ह भ प समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून '' श्री शिव महापुराण कथा '' चालू आहे.

१८ नोव्हेंबर रोजी श्री विश्वेश्वर नाथबाबा विश्वस्त मंडळ आणि नेवासा बुद्रुक येथील ग्रामस्थ यांना आरतीचा सन्मान देण्यात आला.

सदर प्रसंगी ह भ प समाधान महाराज शर्मा , महापौर ज्योतीताई गाडे , उपमहापौर श्री धनंजय जाधव, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष संग्रामदादा कोते आदि विविध नगरसेवकांच्या शुभ हस्ते '' श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या आरतीचे'' विमोचन व नाथबाबांच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

उपमहापौर श्री धनंजय भैया जाधव यांच्या संकल्पनेतून आणि गायक श्री गिरीराज जाधव यांच्या रसाळ वाणीतून श्री



विश्वेश्वर नाथबाबांच्या आरतीचे गायन करण्यात आले. सदरच्या सर्व कार्यक्रमाची संकल्पना आणि कार्यसिद्धी उप महापौर श्री धनंजय जाधव यांची होती , अत्यंत गोड आणि शिस्तबद्ध नियोजन , नाथबाबांच्या आरतीसाठी असलेला गिरीराज जाधव यांचा सुमधुर आवाज , परम पूज्य शांती ब्रह्म भास्करगिरी महाराज (श्रीक्षेत्र देवगड) यांचा शुभ आशीर्वाद , हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते ह भ प समाधान महाराज शर्मा आणि सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक भक्तगणांच्या उपस्थितीमध्ये सदरचा कार्यक्रम पार पडला.

सदर प्रसंगी श्री विश्वेश्वर नाथबाबा संस्थांन नेवासा बुद्रुक चे उपाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर जायगुडे यांच्यासह श्री अनिल पेचे, रामेश्वर कोकणे, संजूबाबा गायकवाड , तानाजी उर्फ बालू फसले, अभिजीत शिंदे, भाऊ जायगुडे, नाना सुरोशे , संदीप भाऊ बोरकर , वेदांत जायगुडे , संकेत गोंजारी, श्री बाळासाहेब शिंदे , श्री लाळगे, विविध भक्तगण आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सदर प्रसंगी श्री विश्वेश्वरनाथ बाबा आणि शिर्डीचे साईबाबा यांचे महत्त्व शर्मा महाराजांनी आपल्या रसाळ वाणीतून श्रोतेगणांना ऐकविले.

नेवासा बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने उपमहापौर श्री व सौ धनंजय जाधव , ह भ प समाधान महाराज शर्मा , महापौर श्री व सौ ज्योती अमोल गाडे , गायक गिरीराज जाधव यांचा सन्मान आणि सत्कार करण्यात आला.

मार्कंडेय सोसायटी येथील

श्री संकटमोचन हनुमान मंदिरात अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव

हनुमान चालीसा, भजनसंध्या , महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– गुलमोहर रोड, मार्कंडेय सोसायटी येथील संकटमोचन हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने दिव्य अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव मोठ्या धार्मिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने भगवान श्रीकृष्ण यांना ५६ प्रकारच्या विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी हनुमान चालीसाचे पठण, भजनसंध्या , महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला, त्यावेळी त्यांना ५६ प्रकारचे नैवेद्य अर्पण करण्यात आले होते, अशी धार्मिक मान्यता आहे. याच परंपरेनुसार दिव्य अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, श्रद्धा, अन्नदान, सेवा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. देवाला अर्पण केलेला प्रसाद भाविकांना वाटप करून आनंद आणि भक्तिभावाचा प्रसार केला जातो.

मार्कंडेय सोसायटी, गुलमोहर रोड येथील श्री संकटमोचन हनुमान मंदिरात मंडळाच्या वतीने हा उत्सव पारंपरिक आणि धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला. सर्व भक्तांच्या वतीने ५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर हनुमान चालीसा पठण, भजनसंध्या , महाआरती आणि भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्येष्ठ सदस्य गोपाल धोकरीया, अशोक खंडेलवाल, हिम्मत खंडेलवाल, हर्षद आनेचा, अजय खंडेलवाल, पवन खंडेलवाल, कमलेश खंडेलवाल आदींनी विशेष परिश्रम घेतले.तसेच महोत्सवासाठी प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व भाविक भक्तांचे मंडळाचे वतीने आभार व्यक्त करण्यात आले. मंडळाच्या वतीने दर मंगळवारी रात्री ८ ते ९ या वेळेत सामूहिक हनूमान चालीसाचे पठणाचे आयोजन करण्याव येते. या अनुष्ठानात सर्व भाविक भक्त उत्साहाने सहभाग घेतात.

राष्ट्रपती पोलीस पदकप्राप्त अंबादास हुलगे यांचा स्नेहबंधतर्फे सन्मान

सोमनाथ घार्गे व डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते नगर क्लब येथे शाल व सन्मानपत्र देऊन गौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बी.डी.डी.एस. (बॉम्ब शोधक व नाशक पथक), अहिल्यानगर येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अंबादास सुखदेव हुलगे यांना राष्ट्रपती पोलीस पदक मिळाल्याबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने त्यांचा शाल व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक तथा सध्या पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई येथे सहाय्यक पोलीस महानिरीक्षक या पदावर कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी सोमनाथ घार्गे आणि स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते नगर क्लब येथे हा सन्मान करण्यात आला.

यावेळी सोमनाथ घार्गे म्हणाले की, ''पोलीस दलात कर्तव्य बजावताना धैर्य, शिस्त, निष्ठा आणि समर्पण या गुणांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अंबादास हुलगे यांनी आपल्या कर्तृत्वातून पोलीस दलाचा गौरव वाढविला आहे. राष्ट्रपती पोलीस पदक हा त्यांच्या दीर्घकालीन सेवाभावाचा, कर्तव्यनिष्ठेचा आणि उत्कृष्ट कार्याचा सन्मान आहे. अशा कर्तृत्ववान पोलीस अधिकाऱ्यांचा गौरव होणे ही अभिमानाची बाब असून त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळेल.''

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो. कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ. रमेश कोठारी, उद्योजक विजय कोठारी आदी मान्यवर उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

मार्कंडेय सोसायटीत शनिवार पासून भागवत कथेस प्रारंभ

अहिल्यानगर- सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील मार्कंडेय सोसायटीत वेदशास्त्र मूर्ती हभप अभिजीत महाराज गोंदीकर (जालना) यांच्या सुमधुर अमृत वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास शनिवार दि. २१ नोव्हेंबर पासून प्रारंभ होत आहे.अशी माहिती अँड.डी. डी. घोरपडे यांनी दिली. शनिवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ ते २७ नोव्हेंबर २०२६ दररोज दुपारी २:३० ते ५:३० या वेळेत ही कथा होणार आहे. स्वर्गीय सौ. मंगलाताई घोरपडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त घोरपडे परिवाराने या भागवत कथेचे आयोजन केले आहे. तरी सावेडी परिसरातील भाविकांनी ही कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन अँड. घोरपडे यांनी केले आहे.



दिवाळीत घरवंट्याच्या माध्यमातून संयुक्ता-अवंतिकाने जपली तेलुगू संस्कृतीची परंपरा!



अहिल्यानगर -दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि भारतीय संस्कृतीतील परंपरांचा सुंदर संगम. या परंपरेचा वारसा जपत अहिल्यानगर येथील एकदंत कॉलनी, दातरंगे मळा परिसरातील संयुक्ता अमोल गाजेंगी आणि अवंतिका अमोल गाजेंगी या दोघींनी दिवाळीनिमित्त आकर्षक घरवंटा (बोम्मरील्लू) साकारला आहे. चिमुकल्या हातांनी तयार केलेल्या या घरवंट्यातून तेलुगू संस्कृती आणि पारंपरिक संसाराचे सुंदर दर्शन घडवण्यात आले आहे. दिवाळीमध्ये देवी लक्ष्मी आणि भगवान गणेशाचे घरात आगमन व्हावे, घरात सुख, शांती, समृद्धी आणि धनधान्य नांदावे, या श्रद्धेतून घरवंटा तयार करण्याची परंपरा आहे. ही परंपरा प्रामुख्याने घरातील मुली आणि लहान मुले मोठ्या उत्साहाने पार पाडतात. माती, विटा किंवा पुठ्ठ्याच्या साहाय्याने छोटे घर तयार करून त्याला फुले, दिवे, रांगोळी आणि विविध खेळण्यांनी सजवले जाते. या पारंपरिक उपक्रमाला तेलुगू भाषेत बोम्मरील्लू असे म्हटले जाते.या घरवंट्याचे विशेष आकर्षण म्हणजे दैनंदिन संसारात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची केलेली मांडणी. स्वयंपाकघरात लागणारी छोटी छोटी भांडी, ताट, वाट्या, पातेली, पळी, चमचे तसेच विविध संसारोपयोगी साहित्य घरवंट्यात मांडण्यात आले आहे. प्रत्यक्ष घरात ज्या पद्धतीने दररोज स्वयंपाक केला जातो, त्याच पद्धतीने या छोटेखानी घरात चहा, नाश्ता आणि जेवण तयार करण्याचा खेळ रंगतो. सकाळचा चहा-नाश्ता, दुपारचे जेवण अशा दैनंदिन दिनक्रमाचे अनुकरण करत संयुक्ता आणि अवंतिका घरवंट्यातून छोटेखानी संसाराचा आनंद अनुभवतात. त्यामुळे हा घरवंटा केवळ सजावटीपुरता मर्यादित न राहता पारंपरिक कौटुंबिक जीवनाचे प्रतीक ठरला आहे. संयुक्ता आणि अवंतिका यांनी कल्पकतेने साकारलेल्या या घरवंट्यातून तेलुगू संस्कृतीतील परंपरा, बालपणीचे खेळ आणि कौटुंबिक संस्कार यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि व्यवहारज्ञान विकसित होण्यास मदत होते. आधुनिक काळातही नव्या पिढीने आपल्या संस्कृतीचा आणि परंपरांचा वारसा उत्साहाने जपण्याचा केलेला हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

वर्तमानपत्रांच्या अडचणी केंद्र सरकारकडे मांडा

वार्षिक विवरणपत्र विलंब दंड माफीसाठी संसदेत प्रश्न उपस्थित करा । खासदार नीलेश लंके यांचेकडे मागणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– देशातील नोंदणीकृत वृत्तपत्रे व नियतकालिकांना वार्षिक विवरणपत्रे सादर करण्यात झालेल्या विलंबापोटी आकारण्यात येणारा आर्थिक दंड पूर्णपणे माफ करावा, तसेच यापूर्वी नाईलाजास्तव भरलेल्या दंडाची रक्कम संपादकांना परत करावी, याचबरोबर वर्तमानपत्रांच्या विविध अडचणी केंद्र सरकार पुढे मांडाव्यात अशी मागणी अहिल्यानगरच्या पहिल्या इंग्रजी दैनिक कॉफी टेबलचे संपादक अभय ललवाणी यांनी खासदार नीलेश लंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आली आहे.

प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया () यांच्याकडे दरवर्षी वार्षिक विवरणपत्र सादर करणे सर्व नोंदणीकृत वृत्तपत्रे व नियतकालिकांसाठी बंधनकारक आहे. सन २०१९ मध्ये ऑनलाइन ई-फायलिंग सुविधा सुरू करण्यात आली. मात्र, अनेक संपादक व प्रकाशकांना या नवीन प्रक्रियेची पुरेशी माहिती नव्हती. त्यानंतर मार्च २०२० पासून आलेल्या कोविड-१९ महामारीमुळे वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला. अनेक नियतकालिकांचे प्रकाशन, वितरण आणि आर्थिक व्यवहार विस्कळीत झाले.

सन २०२३ मध्ये प्रेस सेवा पोर्टल सुरू झाल्यानंतर वार्षिक विवरणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यात आली. मात्र, कोविड काळात प्रलंबित राहिलेल्या विवरणपत्रांवरील दंड भरल्याशिवाय पुढील विवरणपत्रे सादर करण्यास अनेक नियतकालिकांना अडचणी निर्माण होत आहेत. त्यातच पोर्टलमधील तांत्रिक अडचणींमुळेही संपादक व प्रकाशकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

वार्षिक विवरणपत्र सादर करण्यात झालेल्या विलंबापोटी आकारण्यात येणारा १० हजार रुपये व त्यापेक्षा अधिक रकमेचा दंड लहान साप्ताहिके, पाक्षिके आणि मासिकांसाठी मोठा आर्थिक भार ठरत आहे. त्यामुळे अनेक नियतकालिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ग्रामीण व निमशहरी भागात स्थानिक प्रश्न, सामाजिक विषय आणि शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात लहान वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे त्यांना या आर्थिक अडचणीच्या काळात शासनाने दिलासा देण्याची आवश्यकता आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी हा विषय केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्र्यांकडे दंडमाफीसाठी पाठपुरावा करावा, अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व प्रलंबित वार्षिक विवरणपत्रे दंडमुक्त पद्धतीने सादर करण्यासाठी विशेष मुदत द्यावी, यापूर्वी दंड भरलेल्या नियतकालिकांना त्यांची रक्कम परत करावी आणि या प्रश्नावर संसदेत आवाज उठवून देशातील लहान व मध्यम वृत्तपत्रांच्या अडचणी मांडाव्यात, अशीही मागणी श्री ललवाणी यांनी निवेदनात केली आली आहे.

खासदार लंके यांनी या प्रश्नात लक्ष घालून देशातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील लहान व मध्यम वृत्तपत्रांना दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.यावेळी विविध नियतकालिकांचे संपादक व प्रतिनिधी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान; नेत्रसेवेच्या ३५ वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव

सेवेच्या प्रकाशाने अनेकांच्या आयुष्यात उजेड; दिल्लीच्या अचिव्हर अवॉर्ड कौन्सिलने घेतली दखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– गेल्या ३५ वर्षांपासून नेत्रसेवेच्या माध्यमातून हजारो गरजू रुग्णांच्या जीवनात नवदृष्टीचा प्रकाश निर्माण करणारे फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या उल्लेखनीय सेवाभावी कार्याची दखल घेऊन दिल्ली येथील अचिव्हर अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने त्यांना सामाजिक कार्य क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. या सन्मानाची माहिती कौन्सिलचे चेअरमन डॉ. एस. एन. उपाधी आणि सेक्रेटरी सी. एन. सिन्हा यांनी दिली.

दिल्ली येथील अचिव्हर अवॉर्ड कौन्सिल ही भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडे () नोंदणीकृत संस्था असून, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून केले जाते. संस्थेच्या मूल्यांकन मंडळ, संचालक मंडळ आणि अध्यक्षांच्या समितीने जालिंदर बोरुडे यांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्याची माहिती व त्यांच्या योगदानाचे मूल्यमापन करून त्यांची या मानाच्या पदवीसाठी निवड केली.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून तब्बल ३५ वर्षांपासून अविरतपणे नेत्रसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे नेत्रोपचार घेणे शक्य नसलेल्या गरजू रुग्णांना दृष्टी मिळावी, या उदात्त हेतूने त्यांनी स्वखर्चाने तसेच विविध सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने राज्यातील अनेक भागांत मोफत नेत्रतपासणी शिबिरांचे आयोजन केले आहे. या शिबिरांमध्ये शेकडो नव्हे, तर हजारो गरजू रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. मोतिबिंदूचे निदान झालेल्या अनेक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा जग पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

नेत्रसेवेच्या माध्यमातून केवळ रुग्णांवर उपचार करण्यापुरते मर्यादित न राहता समाजात नेत्रदान आणि अवयवदानाविषयी जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही बोरुडे यांनी हाती घेतले आहे. मृत्यूनंतरही आपले डोळे आणि अवयव इतरांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करू शकतात, हा मानवतावादी विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, तर अवयवदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, हा संदेश विविध उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दिला जात आहे.

फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रदान, अवयवदान जनजागृतीसोबतच समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देणारे विविध सामाजिक उपक्रमही राबविले जातात. सामाजिक बांधिलकी, मानवता आणि सेवाभाव या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून बोरुडे यांनी आपले कार्य सातत्याने पुढे नेले आहे. प्रसिद्धी किंवा वैयक्तिक लाभाची अपेक्षा न ठेवता गरजूंच्या जीवनात आनंद आणि आशेचा प्रकाश निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय ठरला आहे.

अहिल्यानगरमधील १० टक्के पाणी कपातीचा निर्णय झाला नाही

अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी अभय योजना; फेज टू पाणी योजनेची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने लागू केलेल्या १० टक्के पाणी कपाती निर्णय झाला नसून शहरातील पाणीप्रश्नावर महापौर ज्योतीताई गाडे यांनी नगरसेवकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत शहराच्या हक्काचे पाणी नागरिकांना मिळावे, अनधिकृत नळ कनेक्शन शोधून अधिकृत करावेत, पाणी वितरणातील असमतोल दूर करावा, गळती रोखावी तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, अशा विविध मागण्या नगरसेवकांनी केल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी देण्यात येणार असल्याची घोषणा नगरसेवक संपत बारस्कर यांनी केली. तर पुढील ३० वर्षांचा विचार करून महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचा ५०० कोटी रुपयांचा डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी गणेश गाडळकर यांनी दिली.

महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, सभापती दीपलीताई बारस्कर, जलसंपदा विभागाचे अभियंता पारखे यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्नावर बैठक आयोजित केल्याबद्दल नगरसेवकांनी महापौरांचे कौतुक केले. तसेच यापुढे महापालिकेच्या सर्व विभागांच्या बैठका आयोजित करून विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

नगरसेवक निखिल वारे यांनी शहराच्या हक्काच्या पाण्याचा मुद्दा उपस्थित करत ग्रामपंचायती आणि इतर शासकीय कार्यालयांना महापालिकेच्या पाइपलाइनमधून देण्यात आलेल्या पाण्याबाबत निर्णय घेण्याची मागणी केली. शहरात सुमारे दीड लाख मालमत्ता असून नळ कनेक्शनची संख्या सुमारे ७० हजार असल्याची माहिती देत या तफावतीकडे लक्ष वेधले. शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढावेत. एकविरा चौकातील एका अपार्टमेंटमध्ये २० फ्लॅट असून तेथे पाणी कुठून येते, याची चौकशी करावी. अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेण्यासाठी नागरिकांना संधी द्यावी; मात्र त्यानंतरही कनेक्शन अधिकृत न केल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.नगरसेविकांच्या पतींनाही पाणीप्रश्नावर आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी महापौरांचे अभिनंदन केले. तसेच फेज टू पाणी योजनेची श्वेतपत्रिका काढून योजनेची सद्यस्थिती, खर्च, पाणी वितरण आणि प्रत्यक्ष लाभ याची माहिती नागरिकांसमोर आणावी, अशी मागणी निखिल वारे यांनी केली.

नगरसेवक अविनाश घुले यांनी शहरातील पाणी वितरणातील असमतोल दूर करण्याची मागणी केली. काही भागात दररोज पाणीपुरवठा होतो, तर काही भागात दोन ते तीन दिवसांनी आणि काही ठिकाणी आठ दिवसांनी पाणी मिळते. हा असमतोल दूर करून पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तयार करावे आणि नागरिकांना पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सांगितले.
पाणी बचत आणि गळती रोखण्यासाठी नळांना तोट्या बसवाव्यात. दुष्काळाच्या परिस्थितीकडे संकट म्हणून न पाहता संधी मानून शासनाकडून पाणीपुरवठा योजनेसाठी विशेष निधी मिळविण्याचा प्रयत्न करावा. पाणीटंचाईसंदर्भातील प्रस्ताव तयार करावेत, नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती करावी. आगामी काही महिन्यांत पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व वाढणार असून नागरिक किंवा नगरसेवकांनी पाइपलाइन गळतीची तक्रार केल्यानंतर तातडीने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे. शहरातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी दुष्काळी आराखडा तयार करावा, असे अविनाश घुले यांनी सांगितले.

नगरसेवक संपत बारस्कर यांनी महापालिकेच्या प्रत्येक विभागाची स्वतंत्र बैठक घेऊन त्या विभागातील प्रश्नांवर चर्चा करावी आणि सर्व विभाग सक्षम करण्याची गरज व्यक्त केली.

सावेडीतील प्रभाग सहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

। भाजप नगरसेवकांची महापौर, आयुक्तांकडे मागणी । भरदिवसा घरफोड्या, वाहनचोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण । जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सीसीटीव्ही बसविण्याची मागणी; काही ठिकाणी नगरसेवक स्वखर्चातून कॅमेरे बसविणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– सावेडी उपनगरातील महापालिका प्रभाग क्रमांक सहामध्ये घरफोड्या आणि वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भरदिवसा घरांमधील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम चोरीला जाण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रभागातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी भाजपचे नगरसेवक करण कराळे, मनोज दुल्लम आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक सहामध्ये अनेक वसाहती, रहिवासी परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणे आहेत. या परिसरात नागरिकांची सतत वर्दळ असते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिसरात घरफोडी आणि वाहनचोरीच्या घटना वारंवार घडत आहेत. नागरिकांच्या घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. विशेषतः भरदिवसा घरफोड्या होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

नगरसेवक करण कराळे यांनी या घटनांबाबत चिंता व्यक्त करत परिसरात परराज्यातील संशयितांकडून चोऱ्यांचे प्रकार सुरू असल्याचे सांगितले. अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रभागातील महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

नगरसेवक पुष्कर कुलकर्णी म्हणाले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक सहामध्ये तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्यामुळे चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यास मदत होईल. परिसरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवता येईल. तसेच चोरी, अपघात आणि इतर अनुचित घटना घडल्यास संबंधितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजचा उपयोग होईल. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ठिकाणी नगरसेवक स्वखर्चातूनही सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभागातील प्रमुख चौक, अंतर्गत रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची ठिकाणे निश्चित करावीत. जिल्हा नियोजन समितीकडून महापालिकेला प्राप्त होणाऱ्या निधीतून हे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यास चोरीच्या घटनांना आळा बसण्यासह नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)ख्रिश्चन सेलच्या अहिल्यानगर जिल्हाअध्यक्षपदी विजय बारसे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेलचा मेळावा व पदग्रहण समारंभ राष्ट्रवादी भवन पुणे येथे पार पडला.या समारंभात ख्रिश्चन सेलचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांच्या उपस्थितीत विजय बारसे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अहिल्यानगर जिल्हाअध्यक्ष(ख्रिश्चन सेल) पदी निवड करण्यात आली.

निवडीचे पत्र त्यांना बाळासाहेब साळवे व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश चिटणीस अशोक बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड.संदीप वर्पे,उत्तर जिल्हाध्यक्ष (ख्रिश्चन सेल) विजय बारसे पुणे शहराचे अध्यक्ष श्रीकांत पाटील , विशाल तांबे,मयूर गायकवाड पुणे शहर अध्यक्ष (ख्रिश्चन सेल)विजय बारसे (अ-नगर जिल्हा अध्यक्ष) यांची विशेष उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून एमॅरिस टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सेल्वम रामकृष्णन नदार हे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना बाळासाहेब साळवे म्हणाले की समाजाचे विविध प्रश्न आणि मागण्या राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्रजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शासन दरबारी पोहोचवून सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असून ज्या पदाधिकाऱ्यांची अध्यक्ष उपाध्यक्ष पदी व कार्यकारणी निवड करण्यात आली आहे त्यांनी आपल्याला जी जबाबदारी दिली आहे ती प्रामाणिकपणे पार पाडावी समाजाच्या प्रगतीसाठी काम करावे समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी तळागाळातील लोकांना मदत करावी. पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे आहे. यांच्या नेतृत्वाखाली ख्रिश्चन समाजाचा भव्य राज्यस्तरीय मेळावा घेण्याचे नियोजन करण्यातआले असून मेळाव्यासाठी राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. सुप्रियाताई सुळे, ऑल इंडिया ख्रिश्चन कौन्सिलचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. हनोक गेरा यांना निमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हाध्यक्ष विजय बारसे म्हणाले की. पक्षाचे ज्येष्ठ नेते यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने माझ्यावर जी जबाबदारी सोपविले आहे त्या विश्वासाला पात्र राहून मी सर्वांना बरोबर घेऊन पक्षाचे काम करेल पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवून, पक्षाची संघटनात्मक बांधणी करेल सामाजिक न्याय, समाजाचे हक्क आणि सर्वांगीण विकासासाठी काम करेल असे ते म्हणाले. मेळाव्यात अहिल्यानगर ,उत्तर जिल्हा, श्रीरामपूर शहर, पुणे शहर तसेच महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेलच्या विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारनेरच्या पाणीप्रश्नाची जबाबदारी माझी

लवकरच योजना मार्गी लावणार । खासदार नीलेश लंके यांची ग्वाही
विकासकामांचे लोकार्पण व नागरी सत्कार सोहळ्यात विविध विषयांवर भाष्य

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर शहराच्या पाणी योजनेचा प्रश्न आता अंतिम टप्प्यात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योजनेसंदर्भातील पत्रावर स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे पारनेर शहराचा पाणीप्रश्न आपणच मार्गी लावणार असल्याची ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली.

पारनेर शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण तसेच जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल आयोजित नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे सभापती गंगारामशेठ बेलकर, संचालक रा या औटी, मारूती रेपाळे, संजय लाकूडझोडे, दिपक लंके, किरण ठुबे, मोहन रोकडे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, नितीन अडसूळ, सुरेखा भालेकर, अर्जुन भालेकर, योगेश मते, डॉ. बाळासाहेब कावरे, हिमानी नगरे, प्रियंका औटी, विद्या गंधाडे, राजू शेख, भूषण शेलार, डॉ. सचिन औटी, ॲड. मंगेश औटी, सचिन नगरे, अमित जाधव, सुभाष शिंदे, वैभव गायकवाड, आनंद औटी, कारभारी पोटघन, महेंद्र गायकवाड, रामा तराळ, बाळासाहेब लंके, चंद्रभान ठुबे, अभयसिंह नांगरे, अमित घनदाट, दिपाली औटी, पाकीजा शेख, वैजयंता मते, सोनिया राजदेव, रविंद्र राजदेव यांच्यासह मोठया संख्येने महिला, नागरिक यावेळी उपस्थित होते. यावेळी महिलांसाठी अमृत झांबरे यांच्या खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार नीलेश लंके हे जिल्हा बँकेच्या निवडणूकीत ६४ मते घेउन विजयी झाल्याबद्दल बेलकर परिवाराच्या वतीने लकी ड्रॉच्या माध्यमातून महिलांना ६४ पैठण्यांचे वितरण करण्यात आले.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची प्रक्रिया सुरू असताना आठ तालुक्यांचे प्रतिनिधित्व करणारा सदस्य असूनही आपल्याला चर्चेसाठी बोलावण्यात आले नाही. त्यामुळे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आणि तब्बल २४ मतांनी विजय मिळविला. या निवडणुकीत सर्वच पक्षांतील लोकांनी मदत केली. आता सर्व पक्षांतील नेत्यांशी आपली आतून दोस्ती सुरू आहे. दिवसा आपला पक्ष आणि संध्याकाळी सर्व पक्षांतील लोकांसोबत बसून चर्चा करायची. कुणाला इंजेक्शन, तर कुणाला गोळ्या द्यायच्या आणि सर्वांना एका रांगेत आणून विकासकामे करून घ्यायची, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली.



या तालुक्यातील जनता आपल्यावर प्रेम करते, हे विरोधकही मान्य करतात. जिल्ह्यात विरोधी पक्षनेत्याची भूमिका आपणच बजावत असल्याचे सांगत त्यांनी आपल्या कामाचा आढावा मांडला. ११ हजार शिक्षकांच्या प्रश्नांसाठी जिल्हा परिषदेत दुपारी दोन वाजल्यापासून रात्री साडेआठपर्यंत ठिय्या आंदोलन केले. शिक्षकांनी अनेक पिढ्या घडविण्याचे काम केले असून, त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

राजकारणातील सत्ता ही सर्वसामान्यांच्या हितासाठी वापरली गेली पाहिजे. पारनेर नगरपंचायतीचे नगरसेवक शहरातील पाणीटंचाईच्या काळात टँकरचे नियोजन करीत आहेत. नागरिकांच्या प्रश्नांसाठी काम करणारा लोकप्रतिनिधी असणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. पारनेर शहरात आपण आमदार असताना मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली. मात्र, या कामांचे मार्केटिंग करण्यात आपण कमी पडलो. त्यामुळे मागील दोन निवडणुकांमध्ये त्याचा फटका बसला. नगरसेवकांनी आता विकासकामांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी. लोणी रस्त्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. भूषण शेलार यांच्या प्रभागातील गाडू मार्ग पूर्ण केला. बापट स्मारकासाठी निधी मंजूर केला असून, विविध प्रभागांतील रस्त्यांची कामे पूर्ण केली आहेत.

देवीभोयरे ते खडकी रस्त्यासाठी आमदार असताना ३५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद असलेले काम मंजूर केले. गव्हाणवाडी ते बेल्हा रस्त्याचे कामही पूर्णत्वाकडे जात आहे. मतदारसंघात न्यायालय आणि बसस्थानक यांसारखी रखडलेली कामे मार्गी लावली. मात्र, काही जण दुसऱ्यांच्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात, असा आरोपही त्यांनी केला.

पारनेर शहराच्या पाणी योजनेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. योजनेचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून मुख्यमंत्र्यांनी त्यासंदर्भातील पत्रावर स्वाक्षरी केली आहे.

मंजूर शेळीपालन योजनांचे वाटप रखडले; पारधी समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन!

६७ लाभार्थ्यांना मंजुरी मिळूनही वाटप नाही; टपरी योजनेसह प्रलंबित निधी तातडीने वितरित करण्याची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आदिवासी पारधी समाजातील लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या शेळीपालन योजनेचे अद्याप वाटप करण्यात आलेले नाही. तसेच विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याने पारधी विकास कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध करीत प्रलंबित योजनांचा लाभ तातडीने देण्याची मागणी करण्यात आली.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या माध्यमातून पारधी समाजातील ६७ लाभार्थ्यांना शेळीपालनासाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चिठ्ठी पद्धतीने या ६७ लाभार्थ्यांची निवडही करण्यात आली होती. मात्र, मंजुरी मिळून चार ते पाच महिने उलटूनही संबंधित लाभार्थ्यांना अद्याप शेळीपालन योजनेचा लाभ मिळालेला नाही. आदिवासी विकास प्रकल्प तसेच जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे गरीब पारधी कुटुंबांची पिळवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कार्यालयांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन राजूर प्रकल्प आणि जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून चौकशी करावी व लाभार्थ्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी केली.



याशिवाय राजूर प्रकल्पांतर्गत ८१ लाख रुपयांच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या टपरी योजनेसाठी लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर केले असून ते तातडीने मंजूर करून योजनेचा लाभ वितरित करावा. तसेच प्रकल्पाकडे शिल्लक असलेल्या ६० लाख रुपयांच्या निधीतून शेळीपालन योजनेपासून वंचित राहिलेल्या दिव्यांग व्यक्ती व एकल महिलांचे प्रलंबित प्रस्ताव मंजूर करावेत, अशीही मागणी करण्यात आली.

गायरान व वनजमिनीवर पूर्वापार शेती करून उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी व दलित समाजातील कुटुंबांच्या जमिनी त्यांच्या नावावर कराव्यात किंवा त्यांना भोगवटादार म्हणून मालकी हक्क प्रदान करावेत, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांच्यासह पारधी विकास कृती समितीचे विशाल पवार, तुकाराम पवार, सोनम धीवर, राहुल पवार, अतिश पवार, शितल काळे, डीसेना पवार, संगीता काळे, त्रिषाली काळे, जिदेभान काळे, सत्यवान काळे, पिंटू काळे, सुरज भोसले, ओपन काळे, शोभा काळे, सकपाल भोसले, प्रशांत भोसले, संगीता भोसले, सुकेश भोसले, परिवार भोसले, शंकर भोसले, पार्लेजी भोसले, मंदाकिनी चव्हाण, आसराबाई काळे, मयुरी भोसले, काझी काळे, बिंदिया भोसले, राजश्री भोसले, ऋतुजा भोसले, गौतम काळे, काजोरी पवार, उर्मिला कावडे, मीनाक्षी पवार यांच्यासह पारधी समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मर्चंट्स बँकेच्या सभासदांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त २४ नोव्हेंबर रोजी ५१०० रूपयांच्या मुदत ठेव पावतींचे वितरण

संचालक मंडळाच्या निर्धारामुळे सभासदांना ऐतिहासिक व संस्मरणीय भेट – चेअरमन संजय चोपडा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अहमदनगर मर्चंट्स को ऑप. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती भेट दिली जाणार आहे. या मुदत ठेव पावती वितरणाचा ऐतिहासिक शुभारंभ सोहळा मंगळवार दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती बँकेचे चेअरमन संजय चोपडा यांनी दिली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विधान परिषदेचे सभापती नामदार प्रा. राम शिंदे भूषविणार आहेत. राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील व बँकेचे संस्थापक चेअरमन सहकारयात्री हस्तीमलजी चांदमलजी मुनोत यांच्या शुभहस्ते सभासदांना मुदत ठेव पावतीचे वितरण केले जाईल. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे, लोकप्रिय आमदार संग्रामभैय्या अरूणकाका जगताप यांची विशेष उपस्थिती असेल.

बँकेने यापूर्वी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना २५०० रूपयांची ठेव पावती तर ४१ व्या वर्षानिमित्त ४१०० रूपयांची ठेव पावतीची भेट दिली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार सर्व मापदंडाचे बँकेने कटाक्षाने पालन करून ठेवीदारांचे व सभासदांचे हित जपण्यास प्राधान्य दिलेले आहे. या अनुषंगाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकताच बँकेला शेड्युल्ड दर्जा दिला. बँकेच्या चांगल्या कामामुळे व वाढत्या कामकाजाच्या आलेखामुळे होणाऱ्या प्रगतीप्रती लेखापरीक्षणामध्ये सतत अ वर्ग मिळत आहे व त्याची पोचपावती म्हणून बँकेस नेहमी पुरस्कार मिळत असतात याचा मला अभिमान वाटतो. आता माझ्या चेअरमन पदाच्या कार्यकाळात सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्यात येत आहे व संस्थापक व विद्यमान संचालक श्री. हस्तीमलजी मुनोत यांचे सभासदांना रक्कम रूपये ५१००/- ची मुदत ठेव पावती देण्याबाबतचे स्वप्न पूर्ण करण्यात माझाही हातभार लागला, याचा मला विशेष आनंद वाटतो, असे संजय चोपडा यांनी सांगितले.

सुवर्णमहोत्सवी वर्ष विशेष समितीचे स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा यांनी सांगितले की, मर्चंट्स बँकेचा सुवर्ण महोत्सवी समारंभ केंद्रीय दळणवळण मंत्री नामदार मा.श्री. नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्या हस्ते बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांना सहकार यात्री उपाधीने सन्मानित करण्यात आले होते. त्याचवेळी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर मूळ प्रस्ताव काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे नामंजूर झाला होता. परंतु बँकेच्या यशस्वी वाटचालीत व प्रगतीत सभासदांच्या विश्वासाचे असलेले योगदान लक्षात घेऊन चेअरमन संजय चोपडा व माझे सर्व सहकारी संचालक मंडळाने निर्धार पूर्वक सकारात्मक व ठाम भूमिका घेतली. त्यानुसार मा. सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. नामदार श्री. बाबासाहेबजी पाटील यांच्यासमवेत लोकप्रिय आमदार संग्रामभैय्या जगताप यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे व त्यांच्या सहकार्यामुळे सदरच्या प्रस्तावास परवानगी मिळविण्यास यश आले. परिणामी सभासदांना ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती देण्याचा मार्ग मोकळा झाला. ३१ मार्च २०१४ आधीच्या सर्व सभासदांना ही ठेव पावतीची ऐतिहासिक भेट मिळणार आहे. यासाठी सुमारे ४ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येऊन लवकरच सदर मुदत ठेव पावत्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी सांगितले की, प्रस्ताव नामंजूर झाला तरी सर्व संचालक मंडळाने सभासदांप्रती असलेली कटीबध्दता जपत सुवर्ण महोत्सवी वर्ष मुदत ठेव पावतीचा विषय मार्गी लावला. या ठाम भूमिकेचे सहकार क्षेत्रातून स्वागत व कौतुक होत आहे. या ठेव पावती वितरण सोहळ्यास सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतकांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन सुवर्णमहोत्सवी वर्ष कमिटीचे अध्यक्ष श्री. अनिल पोखरणा, व्हाईस चेअरमन अमित मुथा, सदस्य तथा संचालक सर्वश्री आनंदराम मुनोत, विजय कोथिंबीरे, संजीव गांधी, सीए मोहन बरमेचा, श्रीमती मीनाताई मुनोत, श्री. संजय बोरा व सर्व संचालक मंडळाचे सदस्य तसेच बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, महिला व बालविकास कल्याण-अंतर्गत कमिटीच्या सदस्या सौ. मनिषाताई गुगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.नितीन भंडारी व कर्मचारी यांनी केले आहे.

खासदार नीलेश लंके यांचे जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षकांच्या बदल्या, पदोन्नती, अतिरिक्त शिक्षक समायोजन आणि गणवेश योजनेतील कथित अनियमिततेच्या विरोधात खासदार नीलेश लंके यांनी बुधवारी (दि. १८) जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू केले. संबंधित अधिकाऱ्यांविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी खासदार लंके यांनी केली. शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय आणि दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका त्यांनी यावेळी स्पष्ट केली.



यापूर्वी ४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सुमारे ११ हजार शिक्षकांनी विविध मागण्यांसाठी उपोषण केले होते. त्यावेळी शिक्षकांच्या मागण्यांसाठी आपण पाठपुरावा करू आणि अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करू, असा शब्द खासदार लंके यांनी शिक्षकांना दिला होता. त्याच आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी आज आंदोलन सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा शिक्षक समन्वय समितीने १२ नोव्हेंबर रोजी दिलेल्या निवेदनातील तक्रारींची शासनस्तरावर स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नती प्रक्रियेत ज्येष्ठता, पात्रता प्रमाणपत्रे, हरकतींचे निवारण आणि पदोन्नती समितीच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

सन २०२५-२६ या निवडसूची वर्षासाठी १ जानेवारी २०२४ रोजीची ज्येष्ठता यादी कोणत्या नियमांच्या आधारे विचारात घेण्यात आली, पदोन्नती समितीची बैठक नियमानुसार झाली होती का, तसेच संबंधित शिक्षकांना हरकती व सुनावणीची संधी देण्यात आली होती का, याची कागदपत्रांसह चौकशी करण्याची मागणी खासदार लंके यांनी केली.

उच्च न्यायालयाच्या १० जुलै २०२६ रोजीच्या निर्णयानंतर आणि शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या निर्देशांनंतरही सप्टेंबर महिन्यात राबविण्यात आलेल्या पदोन्नती प्रक्रियेची तपासणी व्हावी, असेही त्यांनी म्हटले.

सन २०२५ मधील ऑनलाइन बदली प्रक्रिया आणि सन २०२५-२६ मधील अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रियेत नियमांचे पालन झाले का, बदली आदेश व प्रत्यक्ष कार्यमुक्तीमध्ये तफावत राहिली का, तसेच पारनेर तालुक्यातील नऊ शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेत अनियमितता झाली का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली

(पान १ वरून)

बंद घर चोरट्यांच्या निशाण्यावर; सव्वा लाखांची रोकड लंपास

येथे नोकरी करतात. आई सविता या केडगाव येथील घरी राहत होत्या.

१३ नोव्हेंबर रोजी दिवाळी सणानिमित्त आईला माहेरी जायचे असल्याने भाऊ प्रशांत यांनी त्यांना तारकपूर बसस्थानक येथे सोडले होते. त्यानंतर दिवाळी संपल्यानंतर ते कामावर परतले. दरम्यान, १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास आदर्श तनपुरे यांनी घराच्या मुख्य दरवाजाला कुलूप लावले आणि मोटारसायकलवरून पुण्याला कामावर गेले. घर बंद असल्याची संधी चोरट्यांनी साधली.

१८ नोव्हेंबर रोजी सकाळी घरफोडी झाल्याची माहिती मिळताच आदर्श आणि त्यांचा भाऊ प्रशांत यांनी तातडीने केडगाव येथील घरी धाव घेतली. त्यावेळी आई सविता आणि त्यांचे नातेवाईक संदीप नानासाहेब निर्मळ हे देखील उपस्थित होते. घराची पाहणी केली असता मुख्य दरवाजाचे कुलूप गायब असल्याचे दिसून आले. घरातील साहित्याची उचकापाचक करण्यात आली होती. बेडरूममधील कपाटही अस्ताव्यस्त केलेले होते. कपाटातील तसेच घरखर्च आणि अपार्टमेंटच्या देखभाल-दुरुस्तीसाठी ठेवलेली अशी एकूण एक लाख २५ हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याचे समोर आले.

१७ नोव्हेंबरच्या रात्री ११.१५ वाजल्यापासून ते १८ नोव्हेंबरदरम्यान अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि रोकड लंपास केली. याप्रकरणी आदर्श तनपुरे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

चर्चगेट स्थानकाजवळील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे, सौंदर्यस्थळाचे सुशोभीकरण पूर्णत्वाकडे

त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुंबई महापालिका अधिकारी यांच्या बैठकीत स्पष्ट केली होती. त्यानुसार सुरु झालेले हे काम आता पूर्णत्वास आले आहे. सौंदर्य आणि कलात्मकतेच्या दृष्टीने आजच्या पाहणीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांनी महत्वपूर्ण सूचना यावेळी केल्या. याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यावर लवकरच या सुशोभित स्थळाचे उद्घाटन करण्यात येईल.

जावयाच्या नावाने लोन मंजूर झाल्याचे खोटे सांगून महिलेची फसवणूक; सोन्याच्या बांगड्या घेऊन पसार

वजन करून देतो, असे म्हणाला. सुरुवातीला दोन बांगड्या घेतल्यानंतर त्याने पतीकडे दहा रुपये टोकन मागितले, मात्र सुट्टे पैसे नसल्याचे समजताच उर्वरित दोन बांगड्याही काढून घेतल्या. त्यानंतर भामटा समोरच्या दातांच्या हॉस्पीटलमध्ये गेला परंतु तो बराच वेळ झाला तरी परत न आल्याने पती-पत्नीने हॉस्पीटलमध्ये आत जाऊन चौकशी केली असता तो तिथे आढळून आला नाही. त्या अनोळखी भामट्याने आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या घटनेत अंदाजे साडेचार तोळे वजनाच्या १ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या चार सोन्याच्या बांगड्यांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अनोळखी आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गन्हा दाखल केला आहे.

एकविरा चौक परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

झाल्यानंतर फिर्यादीने तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध बीएनएस कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

नंदी भक्ती, भैरवनाथ रक्षणाचे प्रतीक; शिव महापुराण कथेत भक्तांना आध्यात्मिक संदेश

भक्ती केवळ पूजाअर्चेत नसून जीवनातील आचरण, सेवाभाव, कृतज्ञता आणि मनाच्या समृद्धीत असते, असा आध्यात्मिक संदेश त्यांनी दिला.

शिव महापुराण कथा सप्ताहाच्या सहाव्या दिवशी महापौर ज्योतीताई गाडे, प्राध्यापक माणिकराव विधाते, महिला व बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, अमोल गाडे, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, नगरसेवक कुमार वाकळे,निखिल वारे, संजय ढोणे, प्रकाश भागानगरे, नगरसेविका शितल ढोणे,रोशनी त्रिंबके,मयुरी जाधव,गौरी बोरकर, पद्मावती बोरुडे, डॉ. प्रकाश कांकरिया,डॉ, सुधा कांकरिया, भूषण बिहाणी, सचिन कटारिया,सुशांत जाधव,राजू एकाडे, अशोक कानडे, जितेंद्र लांडगे, संजय सांगावकर, विक्रम पाठक, दीपक गोंधळे, स्वाती शिरसूल, अल्का मुंदडा,अभिजित चिप्पा,दीपक गोंधळे,आदी मान्यवरांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कथा, निरूपण आणि भक्तिमय वातावरणामुळे कार्यक्रमात आध्यात्मिक उत्साह अनुभवायला मिळाला.

'लाल परीचे खाजगीकरण होऊ देणार नाही' - रमेश सानप

कर्मचाऱ्यांच्या कष्टावर महामंडळ चालत असून त्यांच्या मेहनतीमुळेच लाल परी टिकून आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचे हित राखणे आणि लाल परीचे खाजगीकरण होऊ न देणे ही सर्व कामगारांची जबाबदारी आहे, असे रमेश सानप यांनी सांगितले. एसटी महामंडळामध्ये काही अधिकाऱ्यांची मनमानी सुरू असून कर्मचारी त्याला कंटाळले आहेत. अधिकाऱ्यांनी खुर्चीचा अहंकार न बाळगता कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाच्या एसटी कर्मचारी संघटनेमध्ये काम केले असून त्याचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रशासनाकडून कोणत्या पद्धतीने मार्गी लावून घ्यायचे, याची मला चांगली माहिती आहे. संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित विभागाध्यक्ष रमेश सानप यांनी केले. यावेळी बाबासाहेब सानप, माजी नगरसेवक सुनील भिंगारे, विपुल पाडळे, विठ्ठल कंठाळे, अनिल शिरसाठ, विठ्ठल जायभाये, ब्रह्मदेव जायभाये, दादासाहेब सांगळे, हरिभाऊ फुंदे, चंद्रकांत सानप, कैलास गर्जे, शरद मुर्तडकर, नईम शेख, संदीप खांडरे आदी एसटी कर्मचारी उपस्थित होते. सत्कारप्रसंगी उपस्थित कर्मचाऱ्यांनी रमेश सानप यांना विभागाध्यक्षपदाच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.